International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 35 March – April - 2026

# महाराष्ट्रातील तडफदार महिला प्रशासकीय अधिकारी

**प्रा. राजेश बागुल[1], प्रो. डॉ. रावसाहेब नन्नावरे[2]**

[1]*संशोधक*

[2]*मार्गदर्शक*

*संशोधन अभ्यास केंद्र*

*मराठी संशोधन केंद्र, शिक्षण प्रसारक संस्था संगमनेर नगरपालिका आर्ट्स, डी.जे. मालपाणी कॉमर्स अँण्ड बी.एन. सारडा सायन्स कॉलेज, घुलेवाडी ता. संगमनेर, जिल्हा. अहमदनगर*

*सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे*

*Corresponding Author – प्रा. राजेश बागुल*

**DOI - 10.5281/zenodo.20489096**

देशाच्या लोकसंख्येच्या अर्धा हिस्सा असणाऱ्या स्त्रियांच्या क्षमतांचा उपयोग केल्याशिवाय देशाची प्रगती पूर्ण होऊ शकणार नाही. संधी मिळाली तर स्त्रिया कोणतीही जबाबदारी पार पाडण्यास सक्षम असतात हे त्यांनी वेळोवेळी सिद्ध केलेले आहे. एकीकडे त्यांच्या कर्तृत्वाचा आपणास अभिमान वाटतो. तर दुसरीकडे समाजामध्ये अजूनही महिलांना सामाजिक पूर्वग्रह व भेदभावांना सामोरे जावे लागते आहे. महिलांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोनात बदल होणे गरजेचे आहे. निवृत्त सनदी अधिकारी आणि महाराष्ट्राच्या पहिल्या महिला निवडणूक आयुक्त म्हणूननीला सत्यनारायण यांची ओळख आहे. त्यांनी सुमारे दीडशे कविता लिहिल्या असूनत्यांनी काही मराठी चित्रपटांसाठी आणि दोन हिंदी चित्रपटांसाठी संगीतदिग्दर्शन केले आहे. नीला सत्यनारायण यांच्या कथेवरून 'बाबांची शाळा' हा मराठीचित्रपट निघाला. त्याचे संगीत दिग्दर्शन त्यांनीच केले होते. नीलासत्यनारायणया १९७२च्या सनदी अधिकारी होत्या १९६५ साली संस्कृत मध्येप्राविण्य मिळवून बोर्डात पहिल्या आलेल्या नीला सत्यनारायण यांचे शालेयशिक्षण मुंबई, पुणे, नाशिक येथे झाले. त्यांनी शालांत परीक्षा दिल्लीबोर्डातून दिली. त्या परीक्षेत त्या १९६५ साली संस्कृत मध्ये प्राविण्य मिळूनबोर्डात पहिल्या आल्या. नंतर त्यांनी इंग्रजी वाड्मय या विषयात पदवी वपदव्युत्तर अभ्यास पूर्ण केला.१९७२ साली त्या आय.ए.एस. ची परीक्षा पास झाल्या.आपल्या मुलांपैकी कोणीतरीभारतीय प्रशासकीय सेवेत अधिकारी व्हावं अशी त्यांचे वडील वासुदेव आबाजीमांडके यांची इच्छा होती. दरम्यान, नीला सत्यनारायण या इंग्रजी साहित्य घेऊनदिल्ली विद्यापीठातून बी.ए. तर पुणे विद्यापीठातून एम.ए. झाल्या.

भारतीय स्टेटबँकेच्या अधिकारी आणि भारतीय प्रशासकीय अधिकारी अशा दोन्ही स्पर्धा परीक्षात त्या निवडल्या गेल्या. त्याकाळी बँकेची नोकरी अधिक आकर्षक होती तर प्रशासकीय नोकरी खडतर होती. पण वडिलांच्या इच्छेला मान देऊन त्या जुलै १९७२ मध्ये भारतीय प्रशासकीय अधिकारी म्हणून भारत सरकारच्या सेवेत दाखल झाल्या. नीला सत्यनारायण यांनी सनदी अधिकारी पदाच्या ३७ वर्षाच्या कारकिर्दीत मुलकीखाते,

गृहखाते, वनविभाग, माहिती आणि प्रसिद्धी, वैद्यक आणि समाज कल्याण, ग्रामीण विकास यासारख्या अनेक खात्यांत सनदी अधिकारी म्हणून काम केले.धारावीत काम करताना तिथल्या झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना त्यांनी निर्यातक्षम चामड्यांच्या वस्तूचे उत्पादन करण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून येणाऱ्या स्त्रियांना सक्षम करण्यासाठी क्रांतिज्योती महिला प्रशिक्षण अभियान सुरू केले.

**महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या महिला राज्यनिवडणूक आयुक्त :**

प्रशासकीय सेवेत नीला सत्यनारायण यांनी सहाय्यक जिल्हाधिकारी – नागपूर, उपविभागीय अधिकारी – भिवंडी, अतिरिक्त जिल्हाधिकारी – ठाणे, पुढे मंत्रालयात समाज कल्याण, सांस्कृतिक विकास व युवाकार्य, अन्न व नागरी पुरवठा, पर्यटन, वस्त्रोद्योग, महिला व बालविकास, सामान्य प्रशासन आणि माहिती व जनसंपर्क, गृह, महसूल व वने आदी विभागात सचिव, प्रधान सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव अशा चढत्या श्रेणीने स्वतःचा ठसा उमटवत पदे भूषविलीत.राज्य निवडणूक आयुक्त म्हणून त्यांची पाच वर्षाची कारकीर्द लक्षणीय ठरली. महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या महिलाराज्यनिवडणूक आयुक्त होण्याचा मान त्यांना मिळाला. या काळात महिला लोकप्रतिनिधींनी सक्षमपणे काम करावं यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबवले.

आजवर ३५ पुस्तकं त्यांची प्रकाशित झाली आहेत. त्यात १२ ललित पुस्तकं, ९ काव्यसंग्रह, काही प्रेरणादायी, काही अनुवादित पुस्तकांचा समावेश आहे. त्यांच्या २ कथांवर चित्रपट निर्माण झाले आहेत. काही प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. १० संगीत सीडी प्रकाशित असून काही चित्रपट, दूरचित्रवाणी, मालिकांसाठीही त्यांनी गीतलेखन केलं आहे. नीला सत्यनारायण यांचा गतिमंद मुलगा चैतन्यवर ओतप्रोत प्रेमाने लिहिलेलं 'एक पूर्ण अपूर्ण' हे स्वानुभवातून लिहिलेलं कथन, तर उद्योजक पती सत्यनारायण यांच्या जीवनावर लिहिलेले सत्य-कथा ही पुस्तकं नुसतीच गाजली नाहीत तर पालकांना, युवकांना सतत प्रेरणा देणारी आहेत. 'जाळरेषा' हे आत्मकथन म्हणजे १७४ पानांचा प्रशासकीय सेवेत काम करणाऱ्या एका अधिकारी 'स्त्री'चा अनुभव-ग्रंथ आहे. हे आत्मकथन लहान दिसत असले तरी त्यात लेखिकेच्या, म्हणजे नीला सत्यनारायण यांच्या विलक्षण जीवनानुभवाचे सखोल विश्लेषण दिसते. नीला सत्यनारायण यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व आणि जीवन प्रणाली अनेकांना माहित आहे. या आत्मकथनात मात्र नोकरीच्या कारकिर्दीसंबंधातील अनेकानेक वेगळया पैलूंवर प्रकाश पडतो.

सरकारी कार्यालयाच्या मोठ्या भिंती आड नेमके काय चालते, तेथील कामकाज, याबद्दल सर्वसामान्यांमध्ये कुतूहल असते. सामान्य जनतेला लालफितीची झळही अनेकदा बसलेली असते. अशावेळी हे आत्मकथन वाचताना अनेकबाबींचा उलगडा होतो. आपल्या प्रस्तावनेत नीला सत्यनारायण म्हणतात, "भारतीय प्रशासन सेवेतला माझा जन्म १९७२ सालचा. तेव्हापासून सलग सदतीस वर्ष सतीचा वाण घेऊनच जगले मी ! सेवेमध्ये अनेकदा अग्निदिव्यं करायला लागली. मी विशिष्ट संस्कार घेऊन प्रशासन सेवेत आले. माझे एकमेव ध्येय होते की, आपल्या अधिकाराचा उपयोग लोककल्याणासाठी व्हावा. तेच संस्कार घेऊन, उच्च मूल्यांचा ठेवा घेऊन प्रशासनात आले. वाटले होते-आपल्या प्रामाणिकपणाचा आपल्या मूल्यांचा ठसा उमटवावा. स्वतःपासून सुरुवात करावी. प्रशासनाच्या मोठ्या फापटपसाऱ्यात छोटेसे का होईना आपले योगदान असावे. मी ज्या अनुभवातून गेले, त्या प्रत्येक प्रसंगी मी बिचकले, मनातून विषण्णही झाले.

शिवाय सेवेतील शिस्तीच्या, नियमांच्या अवजड बेड्या पायात होत्याच. माझी भूमिका, माझी व्यथा मी कुठेच मांडली नाही. मग त्याची एक गोष्ट तयार झाली. माझ्या अग्निपरीक्षेचे क्षण मात्र प्रशासकीयसेवेच्या प्रदीर्घ कालखंडात पुन्हा पुन्हा येतच राहिले. या माझ्या सत्व परीक्षेच्या क्षणांत माझे जेष्ठ व कनिष्ठ सहकारी कसे वागले, हेही मी प्रामाणिकपणाने नमूद केले; तरच मी प्रत्यक्षात घडलेल्या प्रसंगांना खऱ्याअर्थाने जिवंत करू शकेन. नाण्याच्या दोन्ही बाजू दाखवायचा प्रमाणिक प्रयत्न मी केला आहे. चांगले–वाईट, भले-बुरे असे काहीच नसते. प्रत्येक माणसाची त्या त्या प्रसंगाकडे पहायची दृष्टी, काळाचे संदर्भ हेच त्या त्या प्रसंगांचा भावनिक पोत ठरवतात; हेच खरे. वर्षानुवर्षे आपल्याला माहीत असलेली माणसे त्यांच्या स्वार्थाशी आपली टक्कर झाली की, नेमक्या प्रसंगी कशी बदलतात, आपल्याविरोधात कशी जातात; याचाही दाहक अनुभव वारंवार आला. असे अनुभव मला येतच राहिले. त्याची नोंद या आत्मकथनात मी घेतली आहे"

खरे तर लेखिकेचा पिंड कवीचा. साहित्याचा आस्वाद घेत रंगभूमीशी नाते जोडण्याकडे त्यांचा स्वभाविक कल होता. तरी वडिलांच्या इच्छेखातर त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली आणि पतीच्या आग्रहाने त्यांनी या क्षेत्रात प्रशिक्षण घेतले. सेवेत आल्यावर वंचितांच्या उन्नतीसाठी हर प्रकारे प्रयत्न करणे, हे त्यांचे प्राथमिक ध्येय झाले. त्यांचा शिस्तप्रिय कडक स्वभाव सर्वश्रुतच आहे. प्रशासकीय सेवेत असताना त्यांच्या समोर प्रसंगी अनेक प्रलोभने ठेवण्यात आली, प्रसंगी धमक्याही दिल्या गेल्या, पण प्रत्येक वेळी लेखिका समर्थपणे अशा प्रसंगातून बाहेर पडली. नोकरीत कार्यरत असताना त्यांना अनेक अवघड प्रसंगांना सामोरे जावे लागले, वरिष्ठांचा रोष पत्करावा करावा लागला, पण त्यांनी प्रामाणिकपणाची कास आणि स्वत्व सोडले नाही. परिणामी त्यांना अनेकदा बदली स्वीकारावी लागली. या अनुभवातून जाताना त्या वेळोवेळी व्यथित झाल्या. त्यांना पुष्कळ वेळा नोकरी सोडावी असेही वाटले, पण कुटुंबीयांच्या पाठिंबावर त्या शेवटपर्यंत लढत राहिल्या. एवढेच नाही तर त्यांनी त्यांच्या कार्यपद्धतीमुळे प्रत्येक विभागात स्वतःचे स्थान निर्माण केले. नवे कार्यक्षेत्रात रुजू होतांना नवे विषय शिकण्याची, आत्मसात करण्याची त्यांची तळमळ वाखाणण्यासारखी आहे.

जनतेच्या अगणित अडचणीं बद्दलची त्यांची स्वाभाविक संवेदनशीलता, त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये, विशेषत: वरिष्ठांमध्ये असलेली उदासीनता त्यांना सतत अस्वस्थ करीत राहिली. यासाऱ्यांचे सार्थ दर्शन या आत्मकथनात ठायीठायी आढळते. काही वेळा त्यांची चमत्कारिक कोंडीही झाली. काही वेळा उच्च न्यायालयाचे आदेश उल्लंघण्याबद्दल देखील लेखिकेवर दबाव आणला गेला. पण त्यांनी ठामपणे न्यायालयाचा अवमान करण्यास विरोध केला. परिणामी त्यांना अनेक अडथळयांना तोंड द्यावे लागले, पण त्याकायम खंबीर राहिल्या. 'अमर्याद मर्यादां' मध्ये राहून लेखिकेला आपले कार्य करीत राहावे लागले. वेळोवेळी अपमानित व्हावे लागले. असे असले तरी सतत वेगळ्या खात्यातून काम करताना त्यांचे अनुभव क्षेत्र विस्तारत गेले. या अनुभवांतून जातांना लेखिकेचे व्यक्तिमत्व सक्षम, कणखर होत गेले. स्त्री-अधिकारी म्हणून काम करताना त्यांना मानहानीचे - कुचंबनेचे अनुभवही आले. मात्र प्रत्येक प्रसंगी त्यातून बाहेर पडण्याची त्यांची समयसूचकता विस्मयचकीत करणारी आहे. हे प्रसंगही लेखिकेने या आत्मकथनात निर्भीडपणे मांडले आहेत. नोकरदार स्त्रियांसाठी हे पुस्तक म्हणजे मार्गदर्शकच आहे.

प्रशासकीय सेवेतला हा लेखाजोखा लेखिकेने अत्यंत संयमपणे आणि प्रगल्भतेने घेतला आहे. यात

कसलाही आवेश किंवा मोठेपणाचा आव नाही. हे आत्मकथन लिहिताना कोणाची बदनामी करण्याचाही लेखिकेचा हेतू नाही परिस्थिती बदलेल आणि सर्वसामान्य जनमानसाचा आवाज सरकार दरबारी पोहोचेल अशीच आशा लेखिका ठेवते वनविभागात असताना लेखिकेने वन वाचवण्यासाठी वनांचा काही भाग जाळून टाकताना बघितला त्यामुळे मोठी आग वनाच्या गाभ्या पर्यंत पोहोचत नाही. या जाळाला जाळरेषा म्हणतात. त्यातूनच या पुस्तकासाठी त्यांना समर्पक शीर्षक सुचले. प्रस्तावनेत त्या म्हणतात, लोकांना माझी वलयांकित सेवा बघायला मिळाली. त्यांना माझ्या सरकारी घराचा, लाल दिव्याच्या गाडीच्या थाटामाटाचा हेवा वाटायचा. मी हसायची, मनात म्हणायची "ज्याला कळतील माझ्या जाळरेषा त्याला, जाणवतील माझ्या अग्नीपरीक्षांच्या ज्वाला" या ज्वालातून बाहेर पडताना बऱ्याच गोष्टी मी शिकले अनुभव समृद्ध झाले.

**जगण्याचं हुमान :**

मराठी साहित्यात आत्मचरित्र हा समृद्ध साहित्यप्रकार आहे. आणि त्यात स्त्रियांचे आत्मचरित्र आत्मकथन हे समृद्ध आणि वैशिष्ट्यपूर्ण दालन आहे. आज अभिव्यक्तीच्या पातळीवर त्यांना पूर्ण वाव आहे. पण एकेकाळी जेव्हा समाजविचार, रूढी, परंपरा यांच्या तथाकथित बेड्या होत्या. तेव्हा ही अनेक जणींनी आत्मचरित्र लिहिली. जीवन अनुभवण्याची आणि पचवण्याची ताकद, थेट भिडणारी भाषा, म्हणी-वाक्यप्रचारांचा, अलंकार, उपमा-उत्प्रेक्षांचा वापर, भावनिकता, अभिव्यक्ती अशा सगळ्याच पातळ्यांवर त्यातली अनेक आत्मचरित्र लक्षणीय आहेत. अर्थात स्त्रियांची आत्मकथन म्हणजे त्यांच्या नवऱ्याची चरित्र असेही त्या आत्मकथनांबद्दल म्हटले गेलं. आपल्याकडची पुरुष प्रधान संस्कृती स्त्रीच अनुभवविश्व पाहता ते खरं असलं तरी त्या या मर्यादेत राहूनही या स्त्रियांनी आपल्या लिखाणाची दखल घेणं समाजाला भाग पाडलं आहे. या सगळ्या पार्श्वभूमीला कारण आहे, 'हुमान' हे संगीता धायगुडेंचं आत्मकथन. हुमान म्हणजे नियतीने घातलेले कोड. संगीता धायगुडे या आज प्रशासनात उपायुक्त म्हणून काम करतात. १९७१ साली दहावी झालेली त्याचवर्षी बोहल्यावर चढते.

पोलीसात असलेल्या नवऱ्याच्या संसारात रमते. त्यानंतर काही वर्षांनी पतीचा आकस्मिक निधन झालेली संगीता दोन मुलांसह जगण्याच्या लढाईत उतरते, परिस्थितीशी दोन हात करत करत उभी राहते. नुसतं उभी राहत नाही तर इतक्या वर्षानंतर पुन्हा अभ्यास करत परीक्षा देत एम.पी.एस.सी होते. आणि सरकारी सेवेत अधिकाऱ्याच्या पदावर दाखवत होते. हा सगळा प्रवास थक्क करणारा आहे. हुमानमध्ये एका पातळीवर आता अस्तित्वात नसलेल्या प्रियकर - पतीशी अखंड संवाद-साहचर्य आहे आणि दुसऱ्या पातळीवर स्वतःच अस्तित्व सिद्ध करायला उभी असलेली एक स्त्री आहे, एक आई आहे. त्यांचं पतीवियोगाचे चटका लावणारे दुःख वाचकांनाही हळहळायला लावतं. पती असेपर्यंत असलेल्या संपूर्ण सुरक्षाकवच आणि तो गेल्यावर आपला आणि मुलांचा अक्षरशः रस्त्यावर येऊ पाहणारं आयुष्य सावरणारी स्त्री अशा दोन टोकांवरच्या जगण्याचं हुमान नियतीने संगीता धायगुडेयांना यांना घातलं. ते त्यांनी कसं सोडवलं ते मुळातूनच वाचण्यासारख आहे. मुख्य म्हणजे यात माझ्यावर कशी परिस्थिती आली हा आक्रोश नाहीये, त्याला अशा परिस्थितीतून मी कशी उभी राहिले, याचा प्रांजळ निवेदन आहे. भाषा ते हृदयाला भिडणारी आहे. संगीता धायगुडे अर्बन मॅनेजमेंटच्या डिप्लोमा साठी एक वर्षभर जर्मनीला गेल्या होत्या तेव्हा. एक प्रकरण तिथल्या

वास्तवावर आणि लगेच त्याला जोडून पुढचं प्रकरण मागच्या आयुष्यातल्या आठवणी हे त्या आत्मकथनाचा फ्लॅशबॅक तंत्र इतका अचूक आहे की नकळत वाचत त्यांच्या लिखाणात गुंतून जातो. उत्तम धायगुडे असेपर्यंत संसारात, मुलाबाळांत पूर्ण रमलेल्या त्या उत्तमयांच्या निधनानंतर स्वतःसाठी, मुलांसाठी ज्या पद्धतीने उभ्या राहतात, त्यानंतर अभ्यास करून प्रशासकीय ते पाहिलं की संसार पणाला लावल्याशिवाय स्त्री स्वतःचं कर्तृत्व सिद्ध करतांनाही, वास्तव अधोरेखित होतं.

संगीता धायगुडे यांचा एकूणच जीवनप्रवास एक हुमान (कोडे) आहे. नियतीने घातलेले ‘आंधळी’ गावच्या एका डोळस मुलीचे हे आत्मकथन. केवळ शिक्षणाच्या बळावर, आपल्या परिपक्व प्रतिभेच्या सामर्थ्यावर त्या जीवनात आलेले असह्य धक्के पचवू शकल्या. हा त्यांचा मानसिक प्रवास केवळ थक्क करणारा आहे. ‘हुमान’ला मानवीपणाचा स्पर्श आहे. घडले, ते घडताना मनावर जे संस्कार उमटले, जे ओरखडे उमटले ते तसेच सांगण्याचा प्रयत्न संगीता धायगुडे यांनी केलेला आहे. हुमान एखाद्या लोलकाप्रमाणे आपल्यासमोर फिरत राहते. सुंदरता ही केवळ कल्पना असू शकेल. पण आयुष्य केवळ एक अनाकलनीय कोडेच नाही, तर कल्पितापेक्षा सुंदर आहे. याचे प्रत्यंतर ‘हुमान’ घडवले आहे. एकाच वेळी ते मनाला चटका लावणारे, मनाची पकड घेणारे, कोडे घालणारे आणि कोड्याची उकल करणारे असे झाले आहे.

साताऱ्याचा माण तालुका आणि दुष्काळ हे एक समीकरणच आहे. या दुष्काळामुळे परिस्थितीशी दोन हात करण्याचं बाळकडू येथील प्रत्येकाला बालपणीच मिळते. त्यामुळे अगदी जगाच्या पाठीवर कुठेही जाऊन ही माणसं हमखास यशस्वी असतात. संगीता धायगुडे. लहान वयात संसाराची जबाबदारी आली. त्यात पतीचे निधन झाले, मुले, संसार, आयुष्याच्या आव्हान त्रस्त करू लागले आत्महत्येचा विचार मनात डोकावून गेला मात्रपतीच्या डायरीतील एक काव्य प्रेरणादायी ठरले त्यांनी जिद्दीने पाऊल टाकले. राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली अन त्या राजपत्रित अधिकारी बनल्या. या जिद्दी अधिकारी महिलेचे नाव आहे संगीता धायगुडे. साताऱ्याचा मान तालुका, आंधळी गाव येथील बापूराव काळे यांच्या त्या कन्या. त्यांच्याकडे १०० एकर शेती, घरी पाटीलकी, गावातील चार खोल्यांच्या जीवन विद्यामंदिरात भरणाऱ्या वर्गात त्यांचे शिक्षण झाले. हुशार असल्याने त्यांनी पहिली व दुसरीची परीक्षा एकाच वेळेस दिली. अगदी चारचौघींसारखेच त्यांचे बालपण गेले. १९७१ मध्ये दहावीचे शिक्षण सुरू असतानाच पोलीस दलातील अधिकारी उत्तम धायगुडे यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्या संसारात रमल्या. निखिल आणि हर्षल दोन मुले झाली. त्यांच्या संगोपणात त्या गुंतल्या. मात्र पतीच्या प्रोत्साहनाने वीस वर्षाच्या खंडानंतर त्यांनी बारावीची परीक्षा दिली. १९९६ मध्ये मुंबईच्या एस.एन.डी.टी विद्यापीठातून बी.ए.ची पदवी प्राप्त केली. याच सुमारास त्यांच्या आयुष्याने कुस बदलली. नव्या संकटांचे आगमन झाले. पतीची प्रकृती खालावली आणि त्यातच त्यांचे निधन झाले, मुले, संसार आणि आयुष्याचे आव्हान पेलण्याची जबाबदारी एकटीवरच येऊन पडली. पतीच्या जागेवर नियुक्ती व्हावी यासाठी त्यांना खूप धडपड करावी लागली. पतीच्या निधनानंतर सरकारी सोपस्कार करण्यासाठी सरकारी लालफितीचा अनुभव त्यांच्याही गाठीशी आला. अनेकदा मंत्रालयात चकरा माराव्या लागल्या. त्यांच्या आत्मकथनात त्याचा उल्लेख आहे तो असा, “ते दिवस आठवून आजही अंगावर काटा येतो. उदास पोकळीने भरलेले ते दिवस, समाजाचा निष्ठुरपणा, नातेवाईकांच्या नजरा वळवणं आणि मंत्रालयाच्या प्रत्येक कामामध्ये झटावं लागणं. काय नव्हतं त्या दिवसात? दुःख, अपमान,

अभाव, दुबळेपणा, समाजाशी टक्कर देऊन अस्तित्व सिद्ध करणे यावेळी परिचित निकटच्यांनी पाठ फिरवली. निराशेने ग्रासले. आत्महत्येचा विचार मनात घोळत असे. यावेळी पतीची डायरी त्यांच्या हाती पडली. त्यातील काव्यपंक्तींनी जगण्याची नवी उभारी मिळाली.

संसाराचा गाडा पुढे नेण्यासाठी आणि आत्मविश्वासाने राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा देण्याची तयारी सुरू केली. खूप मेहनत घेतली. अभ्यास केला. १९९७ मध्ये त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. त्यासाठी अक्षरशः रात्रीचा दिवस केला. त्यात त्यांच्या मुलांनीही त्यांना मदत केली. घरातील कामे मुले करत. अगदी स्वयंपाकी करीत. १९९९ मध्ये राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत चार लाख विद्यार्थ्यांतून त्या उत्तीर्ण झाल्या. राजपत्रित अधिकारी म्हणून त्यांची नियुक्ती झाली. जीवनाचा एक नवा अध्याय सुरू झाला. त्यांची पहिली नियुक्ती अलिबागला जिल्हा प्रकल्प अधिकारी पदावर झाली. ठाणे महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त, नगरपरिषद संचालक, सहाय्यक संचालक, खेड नगर परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, उल्हासनगर आणि वसई विरार पालिकेत उपायुक्त, नगर परिषद प्रशासन, प्रादेशिक उपसंचालक, धुळे येथे महापालिकेच्या आयुक्त म्हणून काम केले आहे. २००६ मध्ये राज्य शासनाच्या शिष्यवृत्तीतून त्या जर्मनी येथे एक वर्षाचा 'सस्टेनेबल सिटी प्रोग्रॅम' हे प्रशिक्षण पूर्ण केले. विविध आंतरराष्ट्रीय परिषदात त्यांनी सहभाग घेतला आहे.

आपला संबंध जीवनप्रवास त्यांनी हुमान या आत्मकथनात चित्रित केला आहे. २५ डिसेंबर २०१४ ला त्याचे प्रकाशन झाले. अवघ्या २० दिवसात ही आवृत्ती संपली. आजवर त्याच्या आठ आवृत्ती निघाल्यात. या आत्मकथनास पुणे साहित्य परिषदेचा लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार, पंढरपूरचा डॉ. द.ता.भोसले आणि मुंबई मराठी ग्रंथालयाच्या पुरस्कारासह सहा पुरस्कार मिळाले. श्रीमती धायगुडे यांना आजवर महिला जीवनगौरव, पुण्याच्या संस्थेने अहिल्यादेवी, नागरी सेवा पुरस्कार मिळाला. तेजस्विनी पुरस्कार, लायन्स क्लबचा राष्ट्रीय पुरस्कार तसेच जिल्हा पुरस्कार, राजमाता अहिल्यादेवी पुरस्कार, मुख्यमंत्र्यांच्या प्रशस्तीपत्रकासह १८ हून अधिक पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले आहे.

**संदर्भ:**


१. 'जाळरेषा' - सत्यनारायण नीला. परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई.

२. 'हुमान' – धायगुडे उत्तम संगीता. ग्रंथाली प्रकाशन मुंबई.

३. 'अधिकारिणी....प्रशासनातील कर्तृत्वशालिनी – जरग स्वप्ना. सिनर्जी पब्लिकेशन्स पुणे.